# अधिसूचना

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन , २५ मर्झबान पथ.
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २६|६| २०१५.

महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम.

क्रमांक : झेडपीबी २०१५/प्र.क्र.-१८/ तळा (३)/पं.रा.५ .- महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, (सन १९५९ चा महा.अधिनियम- तीन) यांचे कलम ४ चे पोटकलम (२) चा खंड (*ख*) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ चा खंड (*ग*) व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार व संविधानाच्या भाग - IX च्या उद्देशार्थ आणि स्थायी समिती *जिल्हा परिषद* रायगड, *ग्राम पंचायत* तळा, आणि *ग्राम सभा* तळा यांच्याशी विचार विनिमय करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तळा, तारणे,राणेचीवाडी, बामणघर, अंबेली व आनंदवाडी या महसुली गावांच्या समोरील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले स्थानिक क्षेत्र त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून गावाचा भाग म्हणून राहणार नाही असे जाहीर करीत आहे.

## अनुसूची

| अ.क्र. (१) | गांवे. (२) | स्थानिक क्षेत्रे. (३) | गांव म्हणून संपुष्टात आल्याचा दिनांक. (४) |
|---|---|---|---|
| १. | तळा. | मौ. तळा *ग्राम पंचायतीत* असलेले संपुर्ण क्षेत्र. | २६\|६\|२०१५ |
| २. | तारणे. | | |
| ३. | राणेचीवाडी. | | |
| ४. | बामणघर. | | |
| ५. | अंबेली. | | |
| ६. | आनंदवाडी. | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विवेक वि गुजर),
शासनाचे उप सचिव.

Scanned with OKEN Scanner